ह्या अहवालाची अधिकृत प्रत
व यापूर्वीच्या अधिकृत प्रती
वार्षिक निकायसभेच्या ५७-६

"ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तम"

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें.

स्थापना १९४४

ज्योतिर्विद्या परिसंस्था पुणे

JYOTIRVIDYA PARISANSTHA POONA2

सन १९६४-६५ * वर्ष २१ वें

## वार्षिक-वृत्तान्त व समाह्वय

[ पुढील वर्षाच्या निकल्पासह ]

[ वार्षिक निकाय सभेचें निमंत्रण—मलपृष्ठ २ पाहावें ]

प्रकाशक
**मो. ना. गोखले,** B. Sc.
**स. ग. काजरेकर,** B. Sc.
कार्यवाह

बुक-पोस्ट

श्री. रा. रा.

**मो. ना. गोखले**
कार्यवाह, ज्योतिर्विद्या परिसंस्था,
लो. टिळक स्मारक मंदिर,
पुणें २.

## वार्षिक निकायसभेचें निमंत्रण

चालू वर्षाची म्हणजे २२ व्या वर्षाची **निकायसभा** ( General Body Meeting ) **रविवार दि. १७ ऑक्टो. ६५** रोजीं सायंकाळीं ५ वाजतां लो. टिळक मंदिराचे सभागृहांत भरेल. त्या वेळीं पुढील क्रमणिकेत दिलेलें कामकाज होईल. तरी सर्व सद:स्थांनीं सभेस अवश्य उपस्थित राहावें ही विनंती.

## क्रमणिका

( १ ) दिवंगत सभासदांविषयीं दुखवटा.
( २ ) गतवर्षाच्या ( १९६४–६५ ) निकायसभेच्या इतिवृत्तास मान्यता
( ३ ) पूर्वप्रसिद्ध वृत्तान्ताच्या अनुरोधानें गतवर्षांतील कार्याचें निवेदन.
( ४ ) गतवर्षाच्या समाव्ययास मान्यता.
( ५ ) नवीन वर्षाकरितां ( १९६५–६६ ) पदाधिकाऱ्यांची निवड.
( ६ ) १९६५–६६ मध्यें संस्थेनें हातीं घ्यावयाचीं कामें.
( ७ ) ,, ,, च्या निकल्पावर चर्चा.
( ८ ) आयत्या वेळचे विषय, ( अध्यक्षांच्या अनुमतीनें )
( ९ ) प्राध्यक्षांचें भाषण.
( १० ) आभार.

आपले,

**मो. ना. गोखले**

पुणें, दिनांक ५ ऑक्टोबर १९६४. **स. ग. काजरेकर**

कार्यवाह

**टीप**—सभासदांना कांहीं प्रश्न विचारावयाचे असतील, अगर सूचना करावयाच्या असतील तर त्यांनीं सभेपूर्वी निदान तीन दिवस अगोदर कार्यवाह यांच्याकडे तसें लेखी कळवावें.

सभेस अगत्यपूर्वक उपस्थित राहावें.

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें.

" ज्ञानस्य निर्मल नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् "

**[ स्थापना : गणेशचतुर्थी, शके १८६६, दि. २२–८–१९४४ ]**

## सन १९६४–६५ चा ( २२ व्या वर्षाचा ) वृत्तान्त

**प्रिय सद:स्थ व संस्थेचे हितचिंतक,**

दिनांक ३० जून १९६५ ला संपणाऱ्या, संस्थेच्या २१ व्या वर्षाचा हा वार्षिक–वृत्तान्त व समाव्यय आवश्यक त्या पत्रकांसह आपणापुढें सादर करण्यास आम्हांस आनंद होत आहे. सतत प्रगतिपथावर असणाऱ्या आपल्या संस्थेनें आता बाविसाव्या वर्षांत पदार्पण केलें आहे.

**वृत्तान्त वर्षांतील पदाधिकारी:—**

**प्रशासक मंडळ** [ Governing Council ] गतवर्षारंभीच्या निकाय सभेनें [ General Body नें ] १९६४–६५ साठीं प्रशासक–मंडळावर पुढील सन्मान्य सद:स्थांची निवड केली होती.

**प्राध्यक्ष:**– प्रा. डी. डी. कापडिआ, एम्. ए, बी. एस्‌सी. आय. ई. एस. ( निवृत्त )

**अध्यक्ष–:** प्रि. गो. रा. परांजपे, एम्.एस्सी., एफ, एन्. आय्, ओ. बी ई.

**उपाध्यक्ष:**–प्रा. डॉ. मो. वा. चिपळूणकर, एम्. एस्सी., डी. एस्सी, वास्तव विभाग प्रमुख, पुणें विद्यापीठ.

अभ्यासमंडळाच्या कार्याचा, या वर्षीचा, विशेष उल्लेखनीय भाग म्हणजे, कांहीं जिज्ञासू महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विनंतीवरून केलेली दोन व्याख्यान सत्रें. **ज्योतिर्ज्ञानाचें आजचें स्वरूप** व **उच्च ज्योतिःशास्त्राच्या अभ्यासास लागणारें टेन्सॉर कॅलक्यूलस** ह्या दोन विषयांवर ७|७ व्याख्यानांची झालेली हीं दोन सत्रें अनुक्रमें, श्री. मो. ना. गोखले, बी. एस्सी. व प्रा. अजित त्र्यंबक ढवळे एम्. एस्सी. यांनीं चालविलीं.

## विशेष कार्यक्रम : ज्योतिःशास्त्राच्या अभ्यासाचा वासंतिक वर्ग

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विधायक कर्तृत्वाला प्रोत्साहन देण्यासाठीं ‘ किर्लोस्कर ’ मासिकानें सक्रिय सहकार्य देण्याची एक योजना एप्रिल महिन्यांत प्रकट केली होती. तिला साद देऊन, पुण्याच्या एन्जिनिअरिंग कॉलेजचे तीन विद्यार्थी श्री. चंद्रकान्त कुलकर्णी, श्री. रवींद्र नेने, व श्री. सनत्‌कुमार मराठे यांनीं विद्यार्थ्यांसाठी ज्योतिःशास्त्राच्या अभ्यासाचा वासंतिक वर्ग चालविण्याचें ठरविलें व या कार्यास मदत करण्यासंबंधीं परिसंस्थेस विनंती केली. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानासंबंधीं जागृत होत असलेल्या या जिज्ञासेचें स्वागत करून, परिसंस्थेनें या कार्यक्रमांत सक्रिय साह्य व मार्गदर्शन केलें.

हा वर्ग गुरुवार दिनांक २० मे ते रविवार दि. ३० मे १९६५ पर्यन्त, नू. म. विद्यालयाच्या इमारतीत भरविण्यांत आला. वर्गाचे उद्‌घाटन डॉ. मो. वा. चिपळूणकर यांच्या ‘ **ज्योतिर्वास्तव** ’ या व्याख्यानानें झालें. अध्यक्ष-स्थानीं प्रा. ना. म. आठवले एम्. ए. हे होते. या प्रसंगी ‘ किर्लोस्कर ’ मासिकाचे संपादक श्री. मुकुंदराव किर्लोस्कर व कांहीं विज्ञानप्रेमी नागरिकहि उपस्थित होते. वर्गास उपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ३५ होती. या वर्गांत पुढील व्याख्यानें व कार्यक्रम झाले :—

| वार | दिनांक | विषय | वक्ते. |
|---|---|---|---|
| गुरु. | २० मे ६५ | उद्‌घाटनाचे व्याख्यान विषय–ज्योतिर्वास्तव | डॉ. मो. वा. चिपळूणकर, एम्. एस्सी., डी. एस्सी. |
| शुक्र. | २१ मे ६५ | ( १ ) सूर्यकुल | श्री. य. दा. नेने, एम्. एस्सी. |
| | | ( २ ) भारतीय पंचांग | श्री. वि. धों. गोरेशास्त्री |
| शनि. | २२ मे ६५ | ( १ ) चंद्रग्रहणें–भरती–ओहोटी | प्रा. अ. त्र्यं. ढवळे, एम्. एस्सी. |
| | | ( २ ) रात्रीचें आकाश दर्शन | श्री. मो. ना. गोखले, बी. एस्सी. व श्री. स. ग. काजरेकर बी, एस्सी. |
| रवि. | २३ मे ६५ | ( १ ) तारे आणि गांगेय दीर्घिका, | श्री. मा. भ. पंत, बी. एस्सी, |
| | | ( २ ) विद्यापीठाच्या दूरादर्शास भेट. | |



| वार | दिनांक | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| सोम. | २४ मे ६५ | ( १ ) ज्योतिष्यकीय निबंधनें, | श्री. मो. ना. गोखले, बी. एस्सी. |
| | | ( २ ) **परिभादर्शास** भेट | |
| मंगळ. | २५ मे ६५ | ( १ ) पहाटेचें आकाशदर्शन, | श्री. मो. ना. गोखले, बी. एस्सी. व श्री. स. ग. काजरेकर, बी. एस्सी. |
| | | ( २ ) ताऱ्यांची शक्तिनिर्मिति. | प्रा. द. ग. ढवळे, एम्. एस्सी. |
| बुध. | २६ मे ६५ | ( १ ) पालोमारचा २०० इंची दूरादर्शी, | प्रा. द. श्री. जोग, एम्. एस्सी. |
| | | ( २ ) प्रा. आठवले यांच्या वर्णादर्शास भेट. | |
| गुरु. | २७ मे ६५ | ( १ ) दूरतामापन | श्री. स. चिं. मराठे, बी. ई. |
| | | ( २ ) संवह ज्योतिष्यक | श्री. मो. ना. गोखले, बी. एस्सी. |
| शुक्र. | २८ मे ६५ | ( १ ) अवकाश प्रवास आणि मानवनिर्मित उपग्रह. | प्रा. द. वि. बडवे, एम्. एस्सी. |
| | | ( २ ) मानव निर्मित उपग्रह एको–१ व एको–२. | श्री. स. ग. काजरेकर, बी. एस्सी. |
| रवि. | ३० मे ६५ | समारोप. | प्रा. मो. ल. चंद्रात्रेय, एम् ए. |

## अन्य व्याख्याने

परिसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनीं अन्य संस्थांच्या निमंत्रणांवरून ज्योतिःशास्त्राशीं संबंधित विषयांवर पुढील व्याख्यानें दिलीं.

| दिनांक | विषय | वक्ते | संस्था |
|---|---|---|---|
| १६ मे १९६५. | प्रसरणशील विश्व | मो. ना. गोखले | महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय |
| २९ मे १९६५. | न्यूटन ते नारळीकर | ,, | |
| ४ जुलै १९६५. | न्यूटनचे नियम आणि अवकाश प्रवास | ,, | |

## संस्थेस मिळालेल्या देणग्या व अनुदान

या वर्षी संस्थेस पुढीलप्रमाणें देणग्या मिळाल्या :—

( १ ) श्री. अजित त्र्यंबक ढवळे यांनीं आपल्या तीर्थरूपांचे स्मरणार्थ रु. २५/- ची देणगी दिली.

( २ ) श्री. मो. ना. गोखले, श्री. य. रा. नेने व श्री. मा. भ. पंत, या तिघांनीं मिळून रु. ५०/- ची देणगी दिली.

( ३ ) महाराष्ट्र शासनाकडून या वर्षी परिसंस्थेस एकूण रु. २१०/- चे अनुदान मिळाले.

## ग्रन्थसंग्रहांत पडलेली भर

या वर्षी परिसंस्थेच्या ग्रन्थसंग्रहांत पुढील ग्रंथांची भर पडली आहे.

| | |
|---|---|
| ( १ ) आमचें वैदिक वाङ्मय | प्रा. र. वि. वैद्य, एम्. ए. |
| ( २ ) आमची नक्षत्रें | ,, |
| ( ३ ) वेदकालीन कालगणना व यज्ञसंस्था | ,, |
| ( ४ ) वैदिक देवता, त्यांची स्थानें व मंत्र | ,, |
| ( ५ ) भारतीय युद्धकाल-निर्णय | ,, |
| ( ६ ) महर्षि व्यासकृत जय ग्रन्थाचें स्वरूप | ,, |
| ( ७ ) गीता ग्रंथाचें सत्य स्वरूप | ,, |
| ( ८ ) वैदिक वाङ्मय आणि अध्यात्मविद्या | ,, |

त्याचप्रमाणें विज्ञान विषयाला वाहिलेली 'सृष्टिज्ञान' (मराठी) व 'एन्डेव्हर' (इंग्रजी) हीं मासिकें व बेल्जिअमच्या वेधशाळांचीं प्रकाशनें परिसंस्थेला याहि वर्षी मिळत आली आहेत.

## नव सदःस्थांचे स्वागत :-

वृत्तान्त वर्षी पुढील संस्था व सद्गृहस्थ यांना परिसंस्थेचें सदःस्थत्व देण्यांत आलें.

( १ ) महात्मा फुले हायस्कूल, पुणें.
( २ ) श्री. श्रीनिवास नरहर केळकर.
( ३ ) ,, सनत्कुमार चिंतामणि मराठे, बी. ई.
( ४ ) ,, दत्तात्रेय रामचंद्र कापरेकर, बी. एस्सी., बी. टी.
( ५ ) ,, शंकर गोविन्द वैद्य, बी. ए.
( ६ ) प्रा. नरहरी त्र्यंबक वाडेकर, बी. ई. ( मेकॅ. ), एम्. इ. ( इले. ).
( ७ ) ,, हेमकान्त व्यंकटेश बलकुण्डी, एम्. ए., बी. एस्सी.
( ८ ) ,, प्रकाश भास्करराव जोशी, मुंबई.
( ९ ) ,, लक्ष्मण विनायक साठे,
( १० ) ,, विनय विद्याधर जोशी.
( ११ ) ,, उदय धुंडिराज कानिटकर.
( १२ ) ,, चंद्रकान्त सदाशिव कुलकर्णी.
( १३ ) ,, रवीन्द्र महादेव नेने, बी. एस्सी.



( १४ ) ,, रवीन्द्र विश्वनाथ रास्ते.
( १५ ) ,, सुहास मुकुंद शिखरे.

**चिरवियोग :** वृत्तान्त सालीं, डॉ. कृष्णाजी खंडेराव डोळे एम्. एस्सी., पी. एच्.डी. व श्री. त्र्यंबकराव अमृत बेंबावाले, दिवंगत झाले हें कळविण्यास आम्हास फार दुःख होत आहे.

**आभार :** वरीलप्रमाणें परिसंस्थेच्या २१ व्या वर्षाचा अहवाल आपणापुढें ठेविला आहे, त्यावरून संस्थेची प्रगति आपल्या नजरेस येईल. परिसंस्थेच्या कार्यवाहीस सर्व सदःस्थांचे व विज्ञानप्रेमी जनतेचें आम्हास सर्वतोपरी साह्य झालेलें आहे.

संस्थेचे अन्तर्गत अधीक्षक **श्री. ल. के. तांबे** व सरकारमान्य ऑडिटर्स **मेसर्स जी. डी. आपटे आणि कंपनी**, यांनीं प्रतिवर्षाप्रमाणेंच याही वर्षी, परिसंस्थेचे हिशेब विनामूल्य व काळजीपूर्वक तपासून दिले. संस्थेवरील त्यांच्या प्रेमाचेंच हें एक प्रतीक आहे. या शिवाय ज्या अनेक व्यक्ति आणि संस्था यांचें आम्हांस साह्य झालें त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून हें निवेदन संपवितों.

आपले,
५ ऑक्टोबर १९६५.
मो. ना. गोखले
स. ग. काजरेकर

## ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणे १ जुलै १९६४ ते ३० जून ११६५ अखेरचें आयव्ययपत्रक

### आय

| खातें | | रु. पै. |
|---|---|---|
| १. वर्गणी : ( व्यक्तींच्याकडून ) | २८६-०० | |
| ( संस्थाकडून ) | ४०-० | ३२६-०० |
| २. देणग्या : | ७५-०० | |
| अल्पदेणगीदारांकडून | २३-७५ | ९८-७५ |
| ३. सरकारी अनुदान | | २१०-०० |
| ४. व्याज, बँकेकडून | | १८२-१६ |
| ५. संस्थेच्या प्रकाशनांची विक्री | | १२३-९५ |
| | | ९४०-८६ |
| वर्षारंभीची शिल्लक ( १-७-६५ रोजीं ) | | |
| रोख | | १००-४१ |
| बँकेत | | ५,७५६-३३ |
| | | ६,७९७-६० |

### व्यय

| खातें | | रु. पैसे |
|---|---|---|
| १. कचेरी खर्च पगार | २०९-४६ | |
| जागा भाडें | ३००-०० | |
| टपाल | २०-१८ | |
| स्टेशनरी | २८-८४ | |
| वार्षिक वृतान्त्, पत्रकें यांची छपाई व टंक मुद्रितें | १५६-९४ | ७१५-४२ |
| २. सभा आकाश निदर्शनं यांच्या करितां झालेला खर्च | | ५१ ५१ |
| ३. पुस्तक विक्रीवरील सूट | | ९ ८७ |
| ४. साधन संभार ( दुर्बीण तयार करण्यासाठीं आतांपर्यंत झालेला खर्च ) | | ६६-१ |
| ५. ग्रन्थालय | ६-७० | ८४९-६० |
| वर्ष अखेरची शिल्लक ( ३०-६-६५ रोजीं ) | | |
| रोख | | १९५-०१ |
| बँकेत | | ५,७५२-९९ |
| | | ६,७९७-६० |

स. वि. आपटे, नैधिक

परि संस्थेच्या अंतर्गत अधीक्षकांचा अभिप्राय :—

I have checked the accounts for the year 1964–65 and found them Correct.

Sd/- L. K. Tambe Iuternal Auditor



## ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें.

### १९६५–६६ निकल्प

| आय | रु. | पैसे | व्यय | रु. | पैसे |
|---|---|---|---|---|---|
| वर्गणी | ५०० | ०० | पगार | २४० | ०० |
| देणग्या अनुदान | ३०० | ०० | ग्रन्थसंग्रह | ३५० | ०० |
| बँकेकडून व्याज | २०० | ०० | साधन संभार, | | |
| प्रकाशनांची विक्री | २०० | ०० | उपकरणें | ५०० | ०० |
| भांडवली खर्चासाठी | | | व्याख्यानें, आकाश | | |
| अपेक्षित देणग्या | ५०० | ०० | निदर्शनें इ. करिता | १५० | ०० |
| संस्थेच्या निधींतून | ५४० | ०० | कचेरी खर्च | ३०० | ०० |
| | | | फर्निचर | ४०० | ०० |
| | | | जागा भाडें | ३०० | ०० |
| एकूण—२२४०—०० | | | एकूण—२२४०—०० | | |

G. D. Apte & Co.
Charterd Accouutants
with the Assistant Charity Commissioner, Poona
In the matter of Act XXIX of 1950
and
In the matter of

## JOTIRVIDYA PARISANSTHA, POONA.

Public Trust
Public Trust No. F-44
Audit for the year ending 30th June 1965

We, the undersigned Auditors, hereby report that:

(a) The accounts are maintained regularly and in accordance with the provisions of the Act and the rules;

(b) The receipts and disbursements are properly and correctly shown in the accounts;

(c) The cash balance and vouchers in the costudy of the manager or trustee on the date of audit were in agreement with the accounts;

(d) The books, deeds, accounts, vouchers or other documents or record required by us were produced before us;

(e) Inventory certified by the trustee of the movables of the public trust has not / has been maintained;

(f) The manager or trustee appeared before us and furnished the necessary information required by us;

(g) The property or funds of the trust were not applied for any object or purpose other than the object or purpose of the trust;

(h) The amounts of outstandings for more than one year are Rs. NIL and the amounts written off are Rs. Nill

(i) Tenders were / were not invited for repairs or construction involving expenditure exceeding Rs. 5,000.00. Not applicable.

(j) Any money of the public trust has not been invested contrary to the provision of Sec. 35.

(k) Alinations of the immovable property contrary to the provision of Sec. 36 have not come to our notice.

Udited Western Bank Building
Laxmi Rood, Poona 2
18th Sept. 1965

Sd/ G. D. APTE & CO
Chartered Accountants
5-4-7



G. D. Apte & Co.
Chartered Accountants

**Schedule IX C** (vide rule 32)
Poona 2 18th Sept. 1965

**Statement of income liable to contribution for the year ending 30th June 1965**

Name and registered No. of Public Trust

## Jyotirvidya Parisantha, Poona F-44

| | Rs. P. |
|---|---|
| Gross annual income: | 940·86 |

Details of income not chargeable to contribution under Section 58 and Rule 32 :

( i ) Donation to corups.
( ii ) Donations.
(iii ) Grants by Government and other Local Authorities.
(iv ) Interest on Sinking or Depreciation Fund.
( v ) Amount spent for purpose of education.
( vi ) Amount spent for medical relief purpose.
(vii) Deductions out of income from lands used for agricultural purposes.
(a) Land Revenue & Local Fund Cess.
(b) Rent payable to superior landlord.
(c) Cost of production, if lands are cultivated by trust.
(viii) Deductions out of income from lands used for non-agriculture purposes.
(a) Assessment, Cesses and other Govt. or Municiple Taxes.
(b) Ground rent payable to superior landlord.
(c) Insurance premia.
(d) Repairs at $8^1/_3$ per cent of gross rent of buildnigs.
(e) Cost of collection at 4 per cent of gross rent of buildings let out.
( ix ) Cost of collection of income or receipts from securities, stocks, etc. at 1 per cent of such income.
( x ) Deduction on account of repairs in respect of buildings not rented and yielding no income at $8^1/_3$ per cent of the estimated gross annual rent.

The Institution is a Public Trust exclusively for advancement and Propagation of secular education and hence its income is not liable to contribution as per Rule 31(1) (a) of the Bombay Pnblic Trust Rules.

Income liable to contribution Rs. NIL

Dated at Poona 18th Sept. 1965
Trustees Sd. M. N. Gokhale, ( Secretary )
Sd. S. V. Apte, ( Treasurer )

Sd. G. D. Apte & Co.
Chartered Accountants

# ज्योतिर्विद्या परिसंस्थेचीं प्रकाशनें

## उपयुक्त व संग्राह्य

(१) **सूर्यकुल** -- (संग्राहक : प्रा. मो. ल. चंद्रात्रेय व कै. त्र्यं. गो. ढवळे) सूर्यकुलामधील निरनिराळे ग्रह व उपग्रह, उल्का, लघुग्रह, धूमकेतु, इ. संबंधानें ज्ञानसंवर्धक, अद्यायावत् व उपयुक्त माहिती. सुबोध भाषा व विद्वानांनी एकमुखानें वाखाणलेले व डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीनें पारितोषिक देऊन गौरविलेलें. पृष्ठसंख्या २८०, किंमत रु. ५

*　*　*　*

(२) **तारकानगरी**--तारकांनीं व्यापिलेल्या एकंदर विश्वाविषयीं उद्बोधक माहिती. तारकादिकांची ओळख, आकाशगंगेचें स्वरूप, दूर अंतरावरच्या ताऱ्यांची माहिती कशी मिळविली जाते, ताऱ्यांच्या गति कशा काढतात, अंतराळांतल्या अनेक विश्वांचें स्वरूप इ. उपयुक्त व मनोरंजक माहिती. याही प्रकाशनाला डे. व्ह. ट्रान्स्लेशन सोसायटीनें पारितोषिक देऊन गौरविलें आहे व विद्वानांनीं प्रशंसिलें आहे. पृष्ठसंख्या १६५, किंमत ३ रु.

*　*　*　*

**ताराचित्रक संच**-- (आवृत्ति दुसरी, दोन रंगांत छपाई) ठळक ठळक ताऱ्यांची ओळख करून देणारे, आकाशाच्या देखाव्यावरून तारीख व वेळ सांगणारे तसेंच तारीखवेळेवरून आकाशाचें कोणतें दृश्य दिसूं शकेल त्यांचा बोध करणारे दोन मोठे नकाशे. आकार : अनुक्रमें ४० × ३० व २७ × २२ ॥ इंच. सोबत खुलासा देणारी विवरण पुस्तिकाहि मिळते. सर्व संचाची किंमत रु. १=५० पै.

*　*　*　*

(४) **वेधसाधनें व वेधशाळा**--प्राचीन काळापासून वेध घेण्याची साधनें कोणतीं होतीं, त्यांची वाढ व परिणति पुढे कशी झाली, त्यांची रचना, वेधशाळांचें सामान्य स्वरूप व तेथील कार्य व संवहज्जोतिष्यक (Rabio Astronmy) या विषयींची माहिती या ग्रंथांत सुबोध रीतीनें दिली आहे. किंमत रु. २=७५ पै.

*　*　*　*



(५) **चंद्रप्रभा**-- चंद्राचे वाङ्मयांतील उल्लेख, चंद्रामुळें पंचांग कसें बनतें, चंद्रावर बसाहत करणें कितपत शक्य आहे, चंद्राचीं ग्रहणें, भरती ओहोटी वगैरे संबंधानें खुलासा व चटकदार वर्णन. डे. व्हर्ना. ट्रान्स्लेशन सोसायटीनें पारितोषिक देऊन गौरविलेलें पुस्तक. पृष्ठसंख्या १३०, किंमत रु. २=५० पै.

*　*　*　*

(६) **विश्वाची रचना व उत्क्रांति** -- (ले. कै. त्र्यं. गो. ढवळे) सबंध विश्वाची घडण क्रमशः कशी होत गेली, अभिक्रा; दीर्घिका; काय आहेत व या विश्वाची उत्क्रांति कशी होत आहे. यासंबंधीं सोपपत्तिक माहिती. **पृष्ठें ४५, किंमत रु ०=७५ पैसे.**

*　*　*　*

(७) **संज्ञावली**--ज्योतिष्यक शास्त्रातील पारिभाषिक शब्दांचे अर्थ व विवरण. **पृष्ठें २३. किंमत रु. ०·२५ पैसे.**

*　*　*　*

(८) **छोट्या पुस्तका व प्रकाशन निबंध** -- (१) **कालमापन व त्यांचीं साधनें** (ले. कै. त्र्यं., ढवळे) काल म्हणजे काय, त्याचें मापन साधनें इ. खुलासा. (२) **पाश्चात्य ज्योतिष्यकाचा वचारिक इतिहास**-- (ले. कै. त्र्यं. गो ढवळे) खिस्तपूर्व दीड हजार वर्षांपासूनच्या पाश्चात्य शास्त्रज्ञांच्या कल्पना व बदल यांची माहिती. (३) **सूर्याचें अंतरंग** (लेखक : प्रा. दा. गो. ढवळे) सूर्याच्या अंतरंगासंबंधानें माहिती. (४) **सूर्यदेवता** -- (लेखक : प्रा. मो. ल. चंद्रात्रेय) सूर्यासंबंधानें वाङ्मयांतले कांहीं उल्लेख (५) **आर्यांच्या मूळ व वसतिस्थानासंबंधीं झालेल्या व्याख्यानमालेंतील मुद्यांचें टांचण** वरील सर्व छोट्या पुस्तकांची किं. प्रत्येकीं **रु. ०·१२ पैसे.**

*　*　*　*

**टीप**--१. प्रकाशनें व्ही. पी. नें पाठविली जात नाहींत. २. टपाल हशिला-सह पुस्तकांची किंमत मनिऑर्डरनें पाठवावी. ३. सर्व प्रकाशनें शाळा--कॉलेजांना व ग्रंथसंग्रहालयाकरितां उपयुक्त आहेत.

*　*　*　*

**मागणी--श्री. मो. ना. गोखले,** कार्यवाह, ज्योतिर्विद्या परिसंस्था चंद्रकिरण, ११९५ सदाशीव, पुणें २. या पत्त्यावर करावी.

प्रकाशक : मो. ना. गोखले, ज्योतिर्विद्या परिसंस्था; चंद्रकिरण, ११९५ सदाशिव, पुणें.

मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणें २.